मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सूर्यनमस्कार महोत्सव उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांच्या सहभागातून योग, आरोग्य आणि एकतेचा जागर

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व आशा किरण सोशल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वा जागतिक सूर्यनमस्कार महोत्सव मोरया गोसावी क्रीडांगण, केशवनगर, चिंचवडगाव येथे मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. या महोत्सवात शालेय विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी एकत्र येत सूर्यनमस्कार सादर करून योग व उत्तम आरोग्याचा संदेश दिला.

या महोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच प्राचीन भारतीय योगपरंपरेचा जागर करण्यात आला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी माजी महापौर अर्पणा डोके, नगरसदस्य सुरेश भोईर, अनंत कोऱ्हाळे, उप आयुक्त पंकज पाटील,ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर तसेच शहरातील नागरिक उपस्थित होते.

योगशिक्षक निर्मल गुप्ता, आशा किरण फाऊंडेशनचे अध्यक्ष रामकृष्ण पालमकर, वर्षा पवार, अविनाश गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी एकाच वेळी सूर्यनमस्कार सादर करून शिस्त, समन्वय आणि एकतेचे दर्शन घडविले.

सूर्यनमस्कार हा शरीरसामर्थ्य, लवचिकता, श्वसनशुद्धी आणि मानसिक स्थैर्य वाढविण्यास उपयुक्त असल्याचे मत यावेळी उप आयुक्त पंकज पाटील यांनी व्यक्त केले.

तर नियमित सूर्यनमस्कार केल्यास तणावमुक्त जीवनशैली सहज साध्य होऊ शकते असे उप आयुक्त ममता शिंदे म्हणाल्या.

या कार्यक्रमात विविध मनपा माध्यमिक विद्यालयांनी आपला सहभाग नोंदवला. त्यामध्ये वाकड, उद्यमनगर, काळभोरनगर, केशवनगर, पिंपळे गुरव, संत तुकारामनगर, फुगेवाडी, पिंपळे सौदागर, थेरगाव, खराळवाडी, नेहरूनगर, रुपीनगर, श्रमिकनगर (निगडी), पिंपरी नगर, कासारवाडी, लांडेवाडी, किवळे, चिंचवड, चऱ्होली, पिंपळे निलख तसेच उर्दू माध्यमिक विद्यालय व त्यांच्या भाग शाळांचा सहभाग होता.

> “ सूर्यनमस्कार महोत्सव हा पिंपरी चिंचवड शहरासाठी आरोग्य, योग आणि सामाजिक एकात्मतेचा प्रेरणादायी आदर्श ठरला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्वास्थ्याबाबतही जागरूकता निर्माण झाली आहे. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व घटकांनी एकत्र येत एकाच वेळी सूर्यनमस्कार सादर करणे हे शहरातील सामाजिक सलोखा आणि शिस्तीचे उत्तम उदाहरण आहे. अशा उपक्रमांमुळे निरोगी, सशक्त आणि सकारात्मक समाज घडविण्यास निश्चितच चालना मिळेल.
>
> - पंकज पाटील, उप आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

क्रीडा अधिकारी रंगराव कारंडे, क्रीडा पर्यवेक्षक अरुण कडूस तसेच विविध विद्यालयांचे मुख्याध्यापक व क्रीडा शिक्षकही यावेळी उपस्थित होते.

यावेळी संपूर्ण क्रीडांगणात सकारात्मक ऊर्जा आणि उत्साही वातावरण अनुभवायला मिळाले यावेळी स्थानिक नागरिक देखील मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

# कॉमिक्स चॅलेंज स्पर्धेत महापालिकेच्या इंद्रायणी नगर शाळेच्या विद्यार्थीनीचे यश

## ऑनलाइन ‘काळा घोडा कला स्पर्धे’अंतर्गत करण्यात आले होते आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या इंद्रायणी नगर येथील शाळेतील विद्यार्थिनी लावण्या लोहारे हिने ऑनलाइन काळा घोडा कला स्पर्धेअंतर्गत घेण्यात आलेल्या कॉमिक्स चॅलेंज या प्रकारात उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले आहे. राष्ट्रीय स्तरावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

ऑनलाइन काळा घोडा कला स्पर्धेत पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. देशभरातील २०० हून अधिक शाळांचा सहभाग आणि १००० पेक्षा अधिक कलाकृती (एंट्रीज) या स्पर्धेसाठी प्राप्त झाल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा एक महत्त्वपूर्ण, स्पर्धात्मक आणि प्रेरणादायी कला मंच ठरली. ही स्पर्धा तीन आठवड्यांच्या कालावधीत राबविण्यात आली होती. प्रत्येक आठवड्यात विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी कला आव्हाने देण्यात आली होती. यामध्ये डेली कॉमिक्स, बाहुल्या निर्मिती तसेच अभिव्यक्ती कला लँडस्केप्स या उपक्रमांचा समावेश



Lavanya Indrajit Lohare_PCMC School Pune

होता. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळाली आणि त्यांना राष्ट्रीय स्तरावर आपली कला सादर करण्याची संधी मिळाली.

> “ पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थिनीने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद आहे. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला योग्य व्यासपीठ मिळते. महापालिकेच्या शाळांमधील कला शिक्षण आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाले आहे.
>
> – विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रशासनाधिकारी संगीता बांगर व कला नोडल अधिकारी श्रीकांत चौगुले, मुख्याध्यापिका वंदना इन्नानी, कलाशिक्षक विकास आगवणे यांच्या अधिपत्याखाली विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. या यशाबद्दल संबंधित विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# ईशान्य भारतीय बांधवांशी पोलिसांचे 'मैत्री पर्व'!

## पिंपरी-चिंचवडमध्ये 'नॉर्थईस्ट कम्युनिटी कनेक्ट' उपक्रम उत्साहात



**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने एक स्तुत्य पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालकांच्या मार्गदर्शनानुसार, शहरात शिक्षण आणि रोजगारासाठी वास्तव्यास असलेल्या ईशान्य भारतातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी 'नॉर्थईस्ट कम्युनिटी कनेक्ट' हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी ७८ हून अधिक ईशान्य भारतीय नागरिकांनी पोलीस आयुक्तालयातील ध्वजारोहण सोहळ्याला उपस्थित राहून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला.

ध्वजारोहण सोहळ्यानंतर पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय) आणि पोलीस उप-आयुक्त (विशेष शाखा) यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला. या बैठकीत ईशान्य भारतीय नागरिकांना शहरात येणाऱ्या अडचणी, त्यांच्या समस्या आणि त्यावर करता येणाऱ्या उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या नागरिकांच्या मदतीसाठी आणि नियमित संपर्कासाठी आयुक्तालय स्तरावर 'पोलीस उप-आयुक्त (विशेष शाखा)' यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

केवळ आयुक्तालयच नव्हे, तर स्थानिक पोलीस ठाण्यांमध्येही या नागरिकांचे स्वागत करण्यात आले. सांगवी, निगडी, चिंचवड, दापोडी, संत तुकाराम नगर, एमआयडीसी भोसरी, वाकड आणि रावेत अशा विविध पोलीस ठाण्यांमध्ये ईशान्य भारतीय विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी पोलिसांच्या 'डायल ११२' हेल्पलाइन, विविध आपत्कालीन ॲप्स आणि मदत क्रमांकांची माहिती त्यांना देण्यात आली.

बाहेरच्या राज्यातून आलेल्या या बांधवांमध्ये समाजात आपण एकटे नसल्याची आणि पोलीस प्रशासन सदैव पाठीशी असल्याची जाणीव करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. "या उपक्रमामुळे ईशान्य राज्यातील विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये विश्वासाचे नाते घट्ट झाले असून, त्यांच्या मनात सुरक्षितता आणि आपलेपणाची भावना अधिक दृढ झाली आहे," असे मत पोलीस उप-आयुक्त (विशेष शाखा) प्रदीप जाधव यांनी व्यक्त केले.

# रस्टन कॉलनी सोसायटीतील आरोग्य तपासणी शिबिरास नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद

## प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत रमामंगल फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष सौंदणकर यांचा पुढाकार



**पिंपरी | प्रतिनिधी**

देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत रस्टन ग्रीव्हज औद्योगिक कामगार सहकारी वसाहत मर्यादित यांच्या पुढाकारातुन तसेच रमामंगल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष सौंदणकर आणि डॉ. लाल पॅथलॅब यांच्या संयुक्त विद्यमाने अत्यंत अल्पदरात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७ ते दुपारी १ या वेळेत रस्टन कॉलनी सोसायटी ऑफिस, चिंचवड येथे यशस्वीरीत्या पार पडले.

यावेळी रस्टन ग्रिव्हज औद्योगिक कामगार सहकारी वसाहतीचे अध्यक्ष दादा पवार, सचिव विलास कंक, खजिनदार अनिल कदम, कैलास काकडे, अशोक नवले, राजाराम भोसले, रंगराव पाटील, अजय कुंभार, सविता कुरळे, रमा मंगल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष सौंदणकर, कार्याधक्ष सुमित कांबळे, खजिनदार गणेश ओगले, फिरोज खान, प्रशांत शेनॉय, संतोष मोरजकर, महेश शर्मा तसेच रस्टन रॉयल क्रिकेट क्लबचे सर्व सदस्य आणि डॉ. लाल पॅथलॅबचे सचिन पाटील, क्रांती काळे आदी उपस्थित होते.

या आरोग्य तपासणी शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच कामगार वर्गाने मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. शिबिरामध्ये साखर (SUGAR), हिमोग्लोबिन (HEMOGLOBIN), युरिक ॲसिड (URIC ACID), कॅल्शियम (CALCIUM), कोलेस्टेरॉल (CHOLESTEROL), टीएसएच (TSH), एचबीए1सी (HBA1C) यासह विविध महत्त्वाच्या आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. अनुभवी डॉक्टर आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी तपासणी करून नागरिकांना आजार प्रतिबंध, आहार व जीवनशैलीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

संतोष सौंदणकर म्हणाले, "प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सव नसून नागरिकांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि कल्याणाची जबाबदारीची आठवण करून देणारा दिवस आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे अशा तपासणी शिबिरांच्या माध्यमातून आजारांचे लवकर निदान होऊन नागरिक निरोगी जीवन जगू शकतील, हाच आमचा उद्देश आहे. पुढील काळातही रमामंगल फाउंडेशनच्या माध्यमातून असे सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील."

या शिबिरासाठी सुमित कांबळे, गणेश ओगले, प्रशांत शेनॉय, संतोष मोरजकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शिबिरामुळे अनेक नागरिकांना वेळेवर तपासणी व योग्य सल्ला मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. नागरिकांनी आयोजकांचे आभार मानत अशा उपक्रमांची गरज कायम असल्याचे मत व्यक्त केले.

# ड्रग तस्करीचा मास्टरमाईंड पोलीस हवालदारच


## अल्प्राझोलम चोरी प्रकरणात पोलीस हवालदारासह पाच जण अटकेत

**पुणे | प्रतिनिधी**

अहिल्यानगर पोलिसांच्या केंद्रीय मुद्देमाल कक्षातील अल्प्राझोलम हा अमली पदार्थ चोरी करून विक्री प्रकरणात पोलिस हवालदार मुख्य सूत्रधार असल्याची माहिती तपासात मिळाली आहे. या प्रकरणी पोलीस हवालदारासह पाच जणांना पुणे ग्रामीण पोलिसांनी अटक केली असून, त्यांच्याकडून दहा किलो ७०७ ग्रॅम अल्प्राझोलम जप्त कण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थांची किंमत २५ ते ३० कोटी रुपये असल्याची माहिती पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या प्रकरणी पोलीस हवालदार शामसुंदर विश्वनाथ गुजर (वय ३९) याच्यासह शादाब रियाज शेख (वय ४१, रा. डंबे नाला, ता. शिरुर, जि. पुणे ), ज्ञानदेव उर्फ माऊली बाळू शिंदे (वय ३७), ऋषीकेश प्रकाश चित्तर (वय ३५, तिघे रा. कुरुंद, ता. पारनेर), महेश दादाभाऊ गायकवाड (वय ३७, रा. हिंगणी, ता. श्रीगोंदा) यांना नुकतीच अटक करण्यात आली. त्यांच्याविुद्ध शिरुर पोलीस ठाण्यात अमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





'मुद्देमाल कक्षातून चोरी करुन त्याने विक्रीसाठी पाठवलेला अल्प्राझोलम अमली पदार्थ श्रीरापुर पोलिसांनी गेल्या वर्षी जप्त केला होता. गुजर हा अहिल्यानगर पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेत हवालदार होता. पोलिसांकडून विविध गुन्हयात मुद्देमाल जप्त केला जातो. जप्त केलेला मुद्देमाल कक्षात ठेवला जातो. त्याची जबाबदारी पोलीस हवालदार गुजर याच्याकडे होती. गुजर हा अहिल्यानगर पोलिसांच्या केंद्रीय मुद्देमाल कक्षात लिपिक होता. त्यामुळे मुद्देमाल कक्षातील जप्त करुन ठेवण्यात आलेल्या प्रत्येक वस्तूंची त्याला माहिती होती. गुजर याने मुद्देमाल कक्षातून अल्प्राझोलम नावाचा अमली पदार्थ चोरला. त्याऐवजी त्याने अल्प्राझोलम सारखा दिसणारा दुसरा रासायनिक पदार्थ तेथे ठेवला होता', असे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी सांगितले. या वेळी पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतील पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर उपस्थित होते.

'शिरुर परिसरात १७ जानेवारी रोजी अमली पदार्थ विक्री करण्यासाठी काही जण येणार असल्याची माहिती मिळाली होती. पोलीस निरीक्षक शिळीमकर आणि पथकाने सापळा लावून शादाब शेख याला ताब्यात घेतले. शेख हा गॅरेज चालक आहे. शेख याच्याकडून अमली पदार्थ जप्त करण्यात आले. त्यानंतर पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, चित्तर याला ताब्यात घेण्यात आले. चित्तर हा गेल्या दोन ते तीन वर्षांपासून पोलीस हवालदार गुजर याला ओळखत असल्याची माहिती तपासात मिळाली. गुजरने चित्तरला अमली पदार्थ विक्रीसाठी दिला होता. आरोपी गायकवाड आणि शिंदे यांनी शेख याला अमली पदार्थ विक्रीस दिल्याचे निष्पन्न झाल्यानंतर गुजर याच्यासह पाच जणांना अटक करण्यात आली. शेख याच्याकडून एक किलो ५२ ग्रॅम अल्प्राझोलम जप्त करण्यात आले. गुजर, तसेच अन्य आरोपींची चौकशी करण्यात आली. चौकशीत गुजरने पोलसांच्या मुद्देमाल कक्षातून अल्प्राझोलम चोरून आरोपींना विक्रीसाठी दिल्याची माहिती तपासात मिळाली', असे गिल यांनी नमूद केले.

### पोलीस हवालदार गुजरची पार्श्वभूमी काय ?

» पोलीस हवालदार गुजर २००८ मध्ये अहिल्यानगर पोलीस दलात रूजू झाला. प्रशिक्षण कालावधी पूर्ण केल्यानंतर त्याची नियुक्ती पारनेर पोलीस ठाण्यात झाली. तेथे मुद्देमाल कक्षात लिपिक म्हणून त्याने काम पाहिले. पारनेर पोलीस ठाण्यातून त्याची अहिल्यानगर शहरातील तोफखाना पोलीस ठाण्यात नियुक्ती झाली. तेथे काही दिवस काम केल्यानंतर त्याची अहिल्यानगर पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेत नियुक्ती करण्यात आली. तेथे त्याची मुद्देमाल कक्षात लिपिक म्हणून नेमणूक करण्यात आली.

“ पोलीस हवालदार गुजर याच्यासह साथीदारांकडून दहा किलो ७०७ ग्रॅम अल्प्राझोलम जप्त कण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थांची किंमत २५ ते ३० कोटी रुपये आहे. पुणे ग्रामीण पोलिसांकडून या प्रकणाचा सखोल तपास सुरू केला आहे. गुजर याने मुद्देमाल कक्षातील जप्त चीजवस्तू चोरून बाहेर विक्री केल्या आहेत का ? अशा प्रकारचे त्याने आणखी किती गुन्हे केले आहेत. यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. पुणे ग्रामीण पोलिसांनी अहिल्यानगर पोलिसांशी पत्रव्यवहार केला आहे.

– संदीपसिंग गिल, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण

# कौटुंबिक वादातून आईकडून मुला-मुलीवर चाकूने हल्ला

## पती-पत्नीचा वाद झाला अन् आईने पोटच्या मुलाचा जीव घेतला; 11 वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू

**पुणे | प्रतिनिधी**

वाघोली परिसरात आईने ११ वर्षाच्या मुलाचा चाकूने गळा चिरून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. आईने १३ वर्षीय मुलीवर चाकूने वार केले. या घटनेत मुलगी गंभीर जखमी झाली. तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. साईराज संतोष जायभाय (वय ११) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. या प्रकरणी सोनी संतोष जायभाय हिला अटक करण्यात आली आहे. सोनीने १३ वर्षीय मुलगी धनश्री हिच्यावर चाकूने वार केले. या घटनेत ती गंभीर जखमी झाली आहे. 'सोनी जायभाय मूळची नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील रहिवासी आहे. जायभाय कुटुंबीय सध्या वाघोलीतील बायफ रस्त्यावर राहायला आहे. सोनीने हे कृत्य का केले, याची निश्चित माहिती समजली नाही. त्यादृष्टीने तपास सुरू आहे. चौकशीत खूनामागचे निश्चित कारण समजेल', अशी माहिती वाघोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज हांडे यांनी दिली.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. गंभीर जखमी झालेला साईराज आणि त्याची बहीण धनश्री यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच साईराज याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सोनी जायभायने ११ वर्षाच्या मुलाचा खून करुन मुलीवर चाकूने वार केल्याची घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात शोककळा पसरली. पोलीस निरीक्षक हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे



खून प्रकरणात दोन अल्पवयीनांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विकी दिवटे आणि त्याची आई विजया हे चंदननगर भागात राहायला आहेत. आरोपींशी विकीचा वाद झाला होता. २४ जानेवारी रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास नगर रस्त्यावरील वाघोली भागात एका सोसायटीच्या परिसरात आरोपींनी विकीवर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त रजनीकांत चिरमुला, उपायुक्त विवेक मासाळ यांनी घटनास्थळी भेट दिली. गंभीर जखमी झालेल्या विकीला रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. पोलीस उपनिरीक्षक शहादेव हवाले तपास करत आहेत.

### वैमनस्यातून तरुणाचा खून

» पूर्ववैमनस्यातून तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करुन खून करण्यात आल्याची घटना नगर रस्त्यावरील वाघोली परिसरात घडली. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. विकी विजय दिवटे (वय २१, रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत, चंदननगर ) असे खून झालेल्याचे नाव आहे. याबाबत विकी दिवटे याची आई नंदा (वय ४०) यांनी वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी कैलास विठ्ठल राठोड (वय १९, रा. नागपाल रस्ता, चंदननगर),सुशील उर्फ अण्णा सुभाष कदम (वय १९), गणेश उर्फ प्रतीक चंद्रकांत कट्टे (वय १९, दोघे रा. चंदननगर) यांना अटक करण्यात आली.

# गुरुवारी शहरातील बहुतांश भागात पाणीपुरवठा बंद

## पक्षांतर्गत कुरघोड्या: राष्ट्रवादीच्या उमेदवारांना अनपेक्षीत विजय

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेची विविध जलशुद्धीकरण केंद्रे, टाक्या व पंपिंग केंद्रांमध्ये तातडीची विद्युत व पंपिंग विषयक दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी गुरुवारी (२९ जानेवारी) शहराच्या बहुतांश भागाचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. त्यानंतर शुक्रवारी सकाळी उशिरा कमी दाबाने पाणीपुरवठा होणार असल्याची माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिली आहे.

पर्वती नवीन व जुने जलशुद्धीकरण केंद्र, त्याअंतर्गत येणाऱ्या पर्वती एमएलआर, एचएलआर व एलएलआर टाक्या, पर्वती टँक पॉइंट, वडगाव जलशुद्धीकरण केंद्र, राजीव गांधी पंपिंग स्टेशन, लष्कर, चिंचवली, वारजे जलकेंद्र तसेच वडगाव जलकेंद्राशी संबंधित विविध टाक्या व पंपिंग व्यवस्थेची देखभाल व दुरुस्ती करण्यात येणार आहे. या कामासाठी विद्युत पुरवठा आणि पंपिंग यंत्रणा तात्पुरती बंद ठेवावी लागणार असल्याने कालील भागाचा गुरुवारी पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

**पाणीपुरवठा बंद राहणार परिसर**

पर्वती एमएलआर टाकी : गुरुवार पेठ, शुक्रवार पेठ, कसबा पेठ, कात्रज गेट, भवानी पेठ, नाना पेठ, लोहियानगर, सोमवारी पेठ, अर्जुन बेडे स्टेडियम परिसर, घोरपडे पेठ, पर्वती दर्शन.

पर्वती एचएलआर टाकी : सहकारनगर, पद्मावती, बिबवेवाडी, मुकुंदनगर, लोअर व अपर इंदिरानगर, शिवदर्शन, बिबवेवाडी गावठाण, औंधकरनगर, गंगाधाम, शेलार मळा, टिळक वसाहत, पर्वती गावठाण, मितानगर, कुमार पृथ्वी, कोंढवा खुर्दचे काही भाग

पर्वती एलएलआर टाकी : सर्व पेठा, दत्तवाडी, राजेंद्रनगर, लोकमान्य नगर, डेक्कन परिसर, शिवाजीनगर व स्वारगेट.

वडगाव जलकेंद्र : हिंगणे, आनंदनगर, धायरी, आंबेगाव पठार, धनकवडी, कात्रज, भारती विद्यापीठ परिसर, आंबेगाव खुर्द-बुद्रूक, येवलेवाडी, सहकारनगरचा काही भाग, दाते वसाहत.



राजीव गांधी पंपिंग स्टेशन : संतोष नगर, दत्तनगर, आंबेगाव बुद्रूक-खुर्द, बाणेर सिटी, मोझा, श्रीहरी टाकी, बालाजी नगर, केदारेश्वर टाकी, सुखसागर नगर, शेलार मळा, कात्रज गावठाण, धनकवडी, जुना प्रभात ३५ व ४५ विभाग तसेच येवलेवाडी.

खराडी गावठाण, आपले घर, तुळजाभवानी नगर, इऑन परिसर, चौधरी वस्ती, सातव वस्ती, धनेकर नगर, यशवंतनगर, चंदननगर, गणेशनगर, आनंदपार्क, महादेवनगर, माळवाडी आदी भागांवरही या बंदचा परिणाम होणार आहे.

याशिवाय लष्कर जलकेंद्र, वारजे जलकेंद्र, गांधी भवन, पंचकाई क्लब, जीएसआर टाकी, शिवणे इंडस्ट्रीज, एसएनडीटी, एएलआर, चतु:श्रृंगी टाकी, होळकर जलकेंद्र, खडकवासला जॅकवेल व खडकवासला-नांदेड बुस्टर पंपिंग.

# खड्डे चुकवताना ताबा सुटला; भीषण अपघातात दोघांचा मृत्यू

## 2 गंभीर जखमी, कल्याण–आहिल्यानगर राज्य मार्गावरील घटना

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याण–आहिल्यानगर राज्य मार्गावर ओतूर येथील कोळमाथा–नंदलाल लॉन्स परिसरात मंगळवार, दि. २७ जानेवारी रोजी पहाटे सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून रस्त्याच्या दुरवस्थेवरून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

या अपघातात वरद अमोल तांबे (वय २०) रा.ओतूर ता. जुन्नर ( पुणे) व करण पवळे (वय २८) रा. पिरंगुट, पुणे) यांचा मृत्यू झाला. प्राप्त माहितीनुसार, चार तरुण कारमधून कल्याणच्या दिशेने प्रवास करत होते. ओतूर येथील कोळमाथा नजीक रस्त्यावर



मोठ्या प्रमाणात खड्डे असल्याने ते चुकवण्याचा प्रयत्न करत असताना वाहनचालकाचा ताबा सुटला. यावेळी कार प्रथम रस्त्याच्या कडेला असलेल्या कवठाच्या झाडावर जोरात आदळली. त्यानंतर पुढे असलेल्या कठड्याला धडक देत पलटी झाली.

अपघात इतका भीषण होता की कारचे अक्षरशः मोठे नुकसान झाले. वाहनातील चारही तरुण गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी व ओतूर पोलिसांनी तातडीने मदतकार्य सुरू करत जखमींना रुग्णालयात हलवले. त्यापैकी एकाला ओतूर येथील तर दुसऱ्याला आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उर्वरित दोघांना ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले असता डॉक्टरांनी प्राथमिक तपासणी केली असता वरद तांबे व करण पवळे यांना मृत घोषित केले. या अपघातानंतर ओतूर परिसरात शोककळा पसरली असून मृत तरुणांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, स्थानिक नागरिकांनी व वाहनचालकांनी या मार्गावरील रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था असल्याचे सांगितले. कोळमाथा–नंदलाल लॉन्स परिसरात मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून यापूर्वीही येथे अनेक अपघात घडल्याचे नागरिकांनी सांगितले.

संबंधित बांधकाम विभागाने तात्काळ दखल घेऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मानवाधिकार संघाचे तालुकाध्यक्ष हेमंत पा. डुंबरे यांनी दिला आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे प्रशासनाच्या निष्क्रियतेवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.